Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सन 2019–20 ते 2021–22 या तीन वर्षाकरीता प्रमुख अग्रणी महाविद्यालये व त्यांच्या परिक्षेत्रातील महाविद्यालयांची यादी (Cluster) अंतिम करण्यात आली होती. त्यानुसार सर्व प्रमुख अग्रणी महाविद्यालयांमार्फत सन 2019–20 पासून अग्रणी महाविद्यालय योजनेचे कामकाज सुरू आहे. सदर प्रमुख अग्रणी महाविद्यालयांची मुदत दि. 31 मार्च, 2022 रोजी संपुष्टात येणार आहे. तथापि सन 2020–21 व 2021–22 या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये संपूर्ण जगाला कोरोना महामारीने त्रस्त केले होते. विद्यापीठ व महाविद्यालये कोरोनाच्या प्रादुर्भावाने काही वेळेस बंद तर काही वेळेस कमी क्षमतेने सुरू होती. तर ब–याच वेळेस विद्यापीठ, महाविद्यालये यांचे सर्व कामकाज आभासी पध्दतीने सुरू होते. विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयांमध्ये उपस्थित राहू शकत नसल्याने विद्यार्थ्यांकरीता अग्रणी महाविद्यालय योजनेतंर्गत कार्यक्रम आयोजित करणे खूप अडचणीचे होते. त्यामुळे अग्रणी महाविद्यालय योजनेतंर्गत महाविद्यालयांना प्राप्त झालेला निधी / शुल्क विद्यार्थ्यांकरीता विविध कार्यक्रम आयोजित करून खर्च करणे शक्य न झाल्याने ब–याच प्रमाणामध्ये निधी / शुल्क महाविद्यालयांकडे शिल्लक असल्याने ब–याचशा प्रमुख अग्रणी महाविद्यालयांकडून सदरचा निधी / शुल्क विद्यार्थ्यांकरीता विविध कार्यक्रम आयोजित करून खर्च करण्याच्या अनुषंगाने सर्व प्रमुख अग्रणी महाविद्यालयांना एक वर्ष मुदतवाढ देण्याबाबत दूरध्वनीद्वारे वारंवार विनंती केली जात होती.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सद्या कोरोनाचा प्रार्दुभाव ब–याच प्रमाणामध्ये कमी झालेला असल्याने, विद्यापीठ व सर्व महाविद्यालये 100 टक्के उपस्थितीसह सुरू झालेली असल्याने त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी कोविड 19 च्या अनुषंगाने घालण्यात आलेले निर्बंध ब–याच अंशी शिथिल करण्यात आलेले असल्यामुळे ब–याच प्रमुख अग्रणी महाविद्यालयांकडून दूरध्वनीद्वारे करण्यात येणा–या विनंतीनुसार **सर्व प्रमुख अग्रणी महाविद्यालयांना सन 2022–2023 या एक वर्षाकरीता (दि. 31 मार्च, 2023 अखेर) मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

उपरोक्त बाब विचारात घेता, आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, अग्रणी महाविद्यालयाचे कामकाज करीत असताना अग्रणी महाविद्यालयाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये नमुद केलेनुसार दरवर्षी अग्रणी महाविद्यालयांचे हिशोब तयार करून सदरचे हिशोब सोबतच्या विहीत नमुन्यामध्ये तयार करून त्यावर सनदी लेखापाल (*Chartered Accountant*) यांची स्वाक्षरी घेवून विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करावी लागतात. त्यानुसार उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तयार करून घेवून **दिनांक 30 एप्रिल, 2022 पूर्वी** विद्यापीठ कार्यालयास सादर करावे व सन 2021–22 या शैक्षणिक वर्षामध्ये अग्रणी महाविद्यालयाची जी रक्कम अखर्चित आहे ती रक्कम सन 2022–23 या अर्थिक वर्षामध्ये घेवून अग्रणी महाविद्यालयाच्या कार्यक्रमांतर्गत खर्च करावी. तसेच अग्रणी महाविद्यालयांतर्गत परिक्षेत्रामधील महाविद्यालयांमध्ये विविध स्वरूपाचे कार्यक्रम राबविले जातात. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपल्या अग्रणी महाविद्यालयांमध्ये कोणकोणते उपक्रम राबविले याचा सोबतच्या विहीत नमुन्यातील अहवाल तयार करून **दिनांक 30 एप्रिल, 2022 पूर्वी** विद्यापीठ कार्यालयास सत्वर सादर करावा. तसेच **lead.college@unishivaji.ac.in** या ईमेल वरही पाठवून द्यावा.

सोबत :– वरीलप्रमाणे.

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

संदर्भ क्र. शिवाजी वि./अग्रणी महा. योजना / No 0 0 5 1 4
दिनांक : 17 MAR 2022
प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व प्रमुख अग्रणी महाविद्यालये , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

D:\Backup 21-06-2021\Documents\Lead College\Utilization Certificate\Circular.docx

Receipt and payment account for the year ending 31 March, ……………

| Sr. No. | Particulars of Receipts from Opening Balance if any | Amount | Sr. No. | Itemwise Expenditure | Amount |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Signature
Principal of Lead College

Signature and Seal of
Chartered Accountant
Lead College..............

## UTILISATION CERTIFICATE

Certified that an amount of Rs. ___________ was sanctioned to the __________________________________ (Name of College) for the implementation of approved sanctioned plan of Lead Colleges Scheme during the year ___________ against which an expenditure of Rs. ___________ incurred, for the purpose it was sanctioned and unspent balance of Rs. ____________ has been carried forward to next year.

Certified that, I have satisfied myself that the conditions, on which, amount were sanctioned have been duly fulfilled and that I have exercised the following checks to see that the money was actually utilized for the purpose for which it was sanctioned.

Kinds of check exercised.

1) Verified the audited statement of accounts.
2) Verified the vouchers with relevant, Cash Book, Ledger and Bank Pass Book.

Signature
Principal of Lead College

Signature and Seal of
Chartered Accountant
Lead College..............

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संस्थेचे नांव :-

अग्रणी महाविद्यालयाचे नांव :-

शैक्षणिक वर्ष :-

## क्लस्टर महाविद्यालयांमध्ये राबविलेल्या कार्यक्रमाचा तपशिल

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नांव | दिनांक | राबविलेला कार्यक्रम | उपस्थितांची संख्या विद्यार्थी / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी. |
|---|---|---|---|---|
| १ | | | १<br>२<br>३<br>४<br>५ | |
| २ | | | १<br>२<br>३<br>४<br>५ | |

सही /-

प्राचार्य